महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645

**मासं/रवका/न.क्र.०५**
एक्स्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला, प्लॉट नं.१, धारावी रोड, माटुंगा,
मुंबई - ४०० ०१९.
email : cgmhrmsedcl@gmail.com
website : www.mahadiscom.in
दुरध्वनी क्र. ०२२ - ६९४२५१४१

# प्रशासकीय परिपत्रक क्र. ७११ दिनांक ०४ / ०८ / २०२६

**विषय:** कंपनीतील अधिकारी व कर्मचारी यांनी रजा प्रवास सवलत योजनेतंर्गत घोषित केलेले स्वग्राम बदल करण्यासाठी अतिरिक्त संधी देणेबाबत.

*****

सामान्य आदेश क्र.९३ दि.०५.०३.१९८० अन्वये नियमीत/स्थायी कर्मचाऱ्यांना व त्यांच्या कुटुंबीयांना लागोपाठच्या चार कॅलेंडर वर्षाच्या मिळून बनलेल्या एका गटवर्षात एकदा भारतातील कोणत्याही ठिकाणी जाण्यास व दोन गटवर्षात एकदा कर्मचाऱ्याच्या मूळ गावी/स्वग्राम जाण्याकरीता रजा प्रवास सवलत योजना अनुज्ञेय करण्यात आलेली आहे. तसेच या योजनेचा लाभ घेत असतांना कर्मचाऱ्याने प्रथम वेळी मूळ गावी जाण्यापूर्वी त्याचे मूळ गांव/स्वग्राम कोणते आहे या बाबतचे प्रतिज्ञापन सादर करणे आवश्यक आहे.

२. सद्यस्थितीत महिला कर्मचाऱ्यांना विवाह वा तदनुषंगिक अन्य कौटुंबिक घटना किंवा पुरुष व महिला कर्मचाऱ्यांना शासकीय योजना वा नैसर्गिक आपत्तीमुळे ग्राम स्थलांतरण वा अन्य कौटुंबिक/वैयक्तिक कारणास्तव स्वग्राम बदल होत असल्यास सदर स्वग्राम बदलण्याची संधी अनुज्ञेय होत नाही. त्यामूळे कर्मचारी स्वग्राम रजा प्रवास सवलतीचा लाभ घेण्यापासून वंचित रहात असल्याचे निदर्शनास आल्याने कर्मचाऱ्यांना स्वग्राम सवलत उपभोगण्याची संधी प्राप्त होत रहावी या दृष्टीकोनातून महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्र.रप्रस-२०२५/प्र.क्र.९/सेवा-५ दि.२६.०५.२०२६ अन्वये राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना घोषित केलेले स्वग्राम बदल करण्यासाठी अतिरिक्त संधी देणेबाबत सुधारीत तरतूदी पारित करण्यात आलेल्या आहेत.

३. उपरोक्त बाब विचारात घेउन सक्षम अधिकारी यांनी दिलेल्या मंजुरीनुसार शासनाच्या धर्तीवर कंपनी अंतर्गत अधिकारी व कर्मचारी यांना त्यांच्या सेवाकाळात त्यांचे मूळ गांव/स्वग्राम बदल करण्यासाठी अतिरिक्त संधी उपलब्ध करून देण्याकरीता खालील मार्गदर्शक सूचना पारीत करण्यात येत आहेत.

क) अधिकारी व कर्मचारी यांनी रजा प्रवास सवलत योजनेतंर्गत प्रथम वेळी मूळ गावी जाण्यापूर्वी त्यांचे स्वग्राम घोषित करणे बंधनकारक/अनिवार्य राहील. याबाबतच्या सूचनांचा समावेश नवनियुक्त अधिकारी व कर्मचारी यांच्या नियुक्ती आदेशात नियुक्ती अधिकाऱ्यांनी करावा.

ख) स्वग्राम बदलण्याची संधी संपूर्ण सेवा कालावधीत **एकदाच** अनुज्ञेय राहील. तथापि ज्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी यापूर्वी प्रथम नियुक्ती दिनांकापासून ६ महिन्याच्या आत स्वग्राम घोषित केले असून सहा महिन्यानंतर विवाह वा अन्य प्रयोजनामुळे प्रथम घोषित केलेल्या स्वग्रामात बदल झाला असल्यास अशा कर्मचाऱ्यांनाही पुढील सेवा कालावधीत स्वग्राम बदल करण्याची अतिरिक्त संधी उपलब्ध राहील.

ग) i) विहित कालमर्यादेनंतर स्वग्राम घोषित केलेल्या अविवाहित महिला/विवाहित महिलांना, विवाह/घटस्फोट/वैध्यव्य/परित्यक्ता/पुर्नविवाह या घटना प्रसंगास अनुसरुन स्वग्राम बदल झाला असल्यास, सदर प्रशासकीय परिपत्रक निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून ६ महिन्यांच्या आत स्वग्राम बदल करणे बंधनकारक राहील.

ii) अविवाहित महिला/विवाहित महिलांना, सदर प्रशासकीय परिपत्रक निर्गमित झाल्यानंतर विवाह/घटस्फोट/वैध्यव्य/परित्यक्ता/पुर्नविवाह या घटना प्रसंगास अनुसरुन भविष्यात स्वग्राम बदल झाल्यास, सदर घटनेच्या दिनांकापासून ६ महिन्यांच्या आत स्वग्राम बदल करणे बंधनकारक राहील.

घ) i) विहित कालमर्यादेनंतर स्वग्राम घोषित केलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना, सदर प्रशासकीय परिपत्रक निर्गमित होण्यापूर्वी विविध शासकीय योजनांमुळे वा नैसर्गिक आपत्तीमुळे ग्राम स्थलांतरण झाले असल्यास किंवा कौटुंबिक अडचणी वा मुलांचे शिक्षण याकारणे स्थावर मालमत्ता अन्य ठिकाणी घेऊन तेथे स्थायिक झाले असल्याने स्वग्राम बदल झाला असल्यास, सदर प्रशासकीय परिपत्रक निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून ६ महिन्यांच्या आत स्वग्राम बदल करणे बंधनकारक राहील.

ii) कंपनीत कार्यरत अधिकारी व कर्मचारी यांना सदर प्रशासकीय परिपत्रक निर्गमित झाल्यानंतर विविध शासकीय योजनांमुळे वा नैसर्गिक आपत्तीमुळे ग्राम स्थलांतरण झाले असल्यास वा कौटुंबिक अडचणी वा मुलांचे शिक्षण याकारणे स्थावर मालमत्ता अन्य ठिकाणी घेऊन तेथे स्थायिक झाले असल्याने भविष्यात स्वग्राम बदल झाल्यास सदर घटनेच्या दिनांकापासून ६ महिन्यांच्या आत स्वग्राम बदल करणे बंधनकारक राहील.

च) मुद्दा क्र. ग व घ मधील स्वग्राम बदलण्याचे प्रयोजन, सक्षम अधिकाऱ्यांनी खातरजमा करून समर्थनीय वाटल्यास, ते सदर स्वग्राम बदल करण्यास मान्यता द्यावी.

छ) स्वग्राम बदल घोषित करतेवेळी अधिकारी अथवा कर्मचाऱ्याने अर्ज/विनंती एम्प्लॉई पोर्टल मध्ये योग्य त्या कागदपत्रांसहीत सादर करावी व स्वग्राम बदलाची सदरहू अतिरिक्त संधी आहे याचा उल्लेख करावा. सदर अतिरिक्त संधीचा उल्लेख मंजूरी प्राधिकाऱ्याने आदेशातही करावा व सेवापुस्तकातील नोंदीतही करावा.

४. सबब, सर्व संबंधित अधिकारी यांना कळविण्यात येते की, कंपनीतील अधिकारी व कर्मचारी यांना रजा प्रवास सवलत योजनेतंर्गत घोषित केलेले स्वग्राम बदल करण्यासाठी अतिरिक्त संधी देण्याच्या अनुषंगाने पारीत करण्यात आलेल्या उपरोक्त सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

५. उपरोक्त सूचना प्रशासकीय परिपत्रक निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून अंमलात येतील.

६. सदर प्रशासकीय परिपत्रक कंपनीच्या e-Library वर उपलब्ध करण्यात आले आहे.

**(भूषण कुलकर्णी)**
**मुख्य महाव्यवस्थापक (मासं)**

**प्रति,**

महावितरण कंपनीच्या प्रेषण यादीप्रमाणे सर्वांना.